**स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नामनिर्देशनपत्रासोबत उमेदवाराने दयावयाच्या शपथपत्रात अथवा घोषणापत्रात चुकीची माहिती दिल्यास करावयाची कार्यवाही**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र,**
**क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.२५/का-५,**
**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
**मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.**
दिनांक- ११ ऑगस्ट, २००५.

## परिपत्रक

राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्रमांक-एसईसी/जीईएन-२००२/प्र.क्र.८५/का-५, दिनांक-१५ मार्च, २००४ अन्वये महानगरपालिका, नगर परिषदा, नगर पंचायती, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी प्रत्येक उमेदवाराने दयावयाचे प्रतिज्ञापत्र व ग्रामपंचायत निवडणुकांसाठी प्रत्येक उमेदवाराने दयावयाचे घोषणापत्र विहित करण्यात आले आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या असे लक्षात आले आहे की, उमेदवार प्रतिज्ञापत्रात अथवा घोषणापत्रात संपूर्ण माहिती देतातच असे नाही. कधीतरी तर चुकीची माहितीसुध्दा देण्यात येते. निवडणुका झाल्यानंतर किंवा नामनिर्देशनपत्रांचा स्वीकार झाल्यानंतर असे लक्षात आले की, त्यांनी प्रतिज्ञापत्रात अथवा घोषणापत्रात अपूर्ण माहिती अथवा चुकीची माहिती दिली आहे, त्या उमेदवाराविरुध्द भारतीय दंड संहितेच्या कलम १७१जी (निवडणुकीसंदर्भात खोटी माहिती देणे), कलम १७७ (कोणत्याही प्राधिकृत अधिका-यास खोटी माहिती देणे) व कलम १८१ (शपथेवर खोटी माहिती देणे) या कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात यावा.

विशेषत: गुन्हेगारी पार्श्वभूमीबद्दल जी माहिती देण्यात येते त्यामध्ये ब-याचदा असे आढळून येते की, पूर्ण माहिती दिली जात नाही किंवा माहिती लपविण्यात येते. उमेदवाराच्या नांवावर दाखल असलेले दखलपात्र गुन्हे नमूद न करण्याकडे उमेदवारांचा कल असतो. अशा बाबतीत गुन्हा न चुकता दाखल करावा.

( नन्द लाल )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
१) सर्व महानगरपालिका आयुक्त
२) सर्व जिल्हाधिकारी
३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४) सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
५) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

C:\Documents and Settings\PATIL\My Documents\aab७७.doc

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नामनिर्देशनपत्रासोबत
उमेदवाराने द्यावयाच्या शपथपत्रात अथवा घोषणापत्रात
चुकीची माहिती दिल्यास करावयाची कार्यवाही.

## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/मनपा २००७/प्र.क्र.३/का.०५
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २० फेब्रुवारी, २०१३.

## परिपत्रक

राज्य निवडणूक आयोगाचे परिपत्रक क्र. रानिआ / मनपा-२००५ / प्र.क्र.२५ / का.५, दि. ११ ऑगस्ट, २००५ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविणाऱ्या उमेदवारांनी प्रतिज्ञापत्रात अथवा घोषणापत्रात अपूर्ण अथवा चुकीची माहिती दिली तर त्या उमेदवाराविरुध्द भारतीय दंड संहितेच्या संबंधित कलमाखाली गुन्हा दाखल करण्यासंबंधी सूचना दिल्या आहेत.

उमेदवाराने जाहीर केलेल्या संपत्तीची बाजारभावानुसार नेमकी किंमत काय आहे हे माहित नसल्यामुळे काही प्रकरणी उमेदवारावर विनाकारण गुन्हा दाखल केला जाण्याची शक्यता विचारात घेऊन राज्य निवडणूक आयोगाचे परिपत्रक क्रमांक रानिआ/मनपा-२००७/ प्र.क्र.३/का.५, दि. १७ मे, २००७ अन्वये उमेदवाराने प्रतिज्ञापत्रात संपत्ती कमी दाखविल्याबद्दल किंवा संपत्तीबद्दल काही तक्रारी असल्यास अशा प्रकरणी त्या उमेदवारावर गुन्हा दाखल करण्यापूर्वी ते प्रकरण संपूर्ण वस्तुस्थितीसह राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवून त्याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे निदेश प्राप्त करुन घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

राज्य निवडणूक आयोगाच्या निदर्शनास आले आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांकडून सरसकट सर्व प्रकरणे राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविली जातात. यामुळे गुन्हे दाखल करण्याप्रकरणी विनाकारण विलंब होतो.

D:\G Sattadavee & crime order doc\mahaie

राज्य निवडणूक आयोगाचे क्र. रानिआ / मनपा-२००७/ प्र.क्र.३/का.५, दि. १७ मे, २००७ चे परिपत्रक रद्द करण्यात येत असून यासंदर्भात पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

उमेदवाराने शपथपत्रात अथवा घोषणापत्रात चूकीची माहिती दिली असल्याचे आढळून आल्यास अशा उमेदवाराविरुध्द आयोगाच्या उपरोक्त दि.११/०८/२००५ च्या परिपत्रकातील सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी. मात्र संपत्तीबाबत चूकीची माहिती दिल्याबाबतच्या प्रकरणांमध्ये उमेदवाराविरुध्द गुन्हा दाखल करण्यापूर्वी त्याने अशी माहिती हेतुपुरस्सररित्या चूकीची दिली असल्याबाबत खात्री करून घेण्यात यावी.

शपथपत्रामध्ये चुकीची माहिती देणाऱ्या उमेदवारांविरुध्द आतापर्यंत करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती या परिपत्रकासोबतच्या प्रपत्रात भरुन ती या कार्यालयास सादर करण्यात यावी. महानगरपालिकांच्या बाबतीत संबंधित महानगरपालिका आयुक्तांनी व इतर सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी आयोगास सादर करावी. तसेच यापुढे ३१ डिसेंबर अखेर, ३१ मार्च अखेर, ३० जून अखेर तसेच ३० सप्टेंबर अखेरची त्रैमासिक माहिती त्या पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत सोबतच्या विहित प्रपत्रात या कार्यालयास सादर करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(वि. मा. पानसरे)
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व नगरपरिषदा / नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

**राज्य निवडणूक आयोगाचे परिपत्रक क्रमांक-रानिआ/मनपा-२००७/प्र.क्र.३/का-५, दिनांक- २० फेब्रुवारी, २०१३ सोबतचे प्रपत्र**

दि.:__________पर्यंतचा तिमाही अहवाल

__________महानगरपालिका / जिल्हाधिकारी

| अ.क्र. | स्थानिक स्वराज्य संस्थेचे नांव | उमेदवाराचे नांव | प्रभाग क्रमांक/निवडणूक विभाग/निर्वाचक गण नाव व क्रमांक | शपथपत्र सादर केल्याचा दिनांक | मतदानाचा दिनांक | तक्रारदाराचे नांव | केलेल्या कार्यवाहीचा तपशील (खटला दाखल करण्यात आला असल्यास त्याबाबतचा तपशील) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

दि.:__________

__________महानगरपालिका आयुक्त / जिल्हाधिकारी